क्र. १४१ पहिले वर्ष

# रविवारची उपासना

२३ एप्रिल २०२३

## पुनरूत्थानानंतरचा तिसरा रविवार

### प्रस्तावना

आजच्या शुभवर्तमानात प्रभू येशू तीनवेळा पेत्राला प्रश्न करतो की, तू माझ्यावर प्रीती करतोस काय? तोच प्रश्न ख्रिस्त आज आपल्या प्रत्येकाला विचारत आहे. तू माझ्यावर प्रीती करतोस काय? देवपित्याने त्याच्या पुत्राला जगाचे तारण करण्यासाठी पाठविले. रंजले गांजलेल्यांची सेवा करण्यासाठी ख्रिस्त आपणा प्रत्येकाला त्याच्या नावाने व पवित्र आत्म्याच्या कृपादानाने सुवार्ता पसरविण्यास आमंत्रण करीत आहे. परमेश्वराची कृपा व पवित्र आत्म्याचा सहवास व पुनरुत्थित ख्रिस्ताचा प्रकाश जसा शिष्यांना मिळाला, त्याचप्रमाणे त्याचे सुंदर कार्य करण्यास आपल्याला कृपा मिळावी म्हणून प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे प्रभो, आमच्या सर्वसमर्थ बापा, तू आम्हाला तुझे पुत्र व कन्या बनवले आहेस व आमचे आध्यात्मिक तारुण्य पुन्हा दिले आहेस. आमच्या पुनरुत्थानाची आशेने वाट पाहण्यास आम्हाला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

**प्रभूशब्द विधी**

### पहिले वाचन

**प्रेषितांची कृत्ये या पुस्तकातून घेतलेले वाचन २:१४, २२-२८**

**''ह्या येशूला देवाने उठवले ह्याविषयी आम्ही सर्व साक्षी आहे.''**

पेत्र अकरा शिष्यांबरोबर उभा राहून त्यांना मोठ्याने म्हणाला, ''अहो यहुदी लोकांनो आणि यरुशलेमातील रहिवाशांनो, हे लक्षात आणा आणि माझे बोलणे ऐकून घ्या.

अहो इस्राएल लोकांनो, ह्या गोष्टी ऐका. नाझरेथकर येशूच्याद्वारे देवाने जी महत्कृत्ये चमत्कार आणि चिन्हे तुम्हाला दाखवली त्याची तुम्हाला माहिती आहे. त्यावरून देवाने तुम्हांकरिता पाठविलेला असा तो मनुष्य होता. तो देवाच्या ठाम संकल्पानुसार आणि पूर्वज्ञानानुसार तुमच्या स्वाधीन झाल्यावर तुम्ही त्याला धरून अधर्म्यांच्या हातांनी क्रूसावर खिळून मारले. त्याला देवाने मरणाच्या वेदनापासून सोडवून उठवले. कारण मरणाच्या स्वाधीन राहणे अशक्य होते.

दाविद त्याच्याविषयी असे म्हणतो :

मी परमेश्वराला आपणापुढे नित्य पाहिले आहे. मी ढळू नये म्हणून तो माझ्या उजवीकडे आहे ह्यास्तव माझे हृदय आनंदित आणि माझी जीभ उल्हासित झाली. आणखी माझा देहही आशेवर राहील. कारण तू माझा जीव अधोलोकात राहू देणार नाहीस आणि आपल्या पवित्र पुरुषाला कुजण्याचा अनुभव येऊ देणार नाहीस. जीवनाचे मार्ग तू मला कळविले आहेस, तू आपल्या सान्निध्याने मला हर्षभरीत करशील.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**१६:१-२.५,७-८, ९-१०,११**

प्रतिसाद : **देवा, मला सांभाळ, मी तुझ्या आश्रयाला आलो आहे.**

१. हे देवा, माझे रक्षण कर कारण मी तुझ्या आश्रयास आलो. मी परमेश्वराला म्हटले, ''तूच माझा प्रभू आहेस. माझा बहुमान तूच आहेस.''

२. परमेश्वराने मला बोध केला आहे, त्याला मी धन्यवाद देतो. माझे अंतर्यामही मला रात्री
उपदेश करते. मी आपल्यापुढे परमेश्वराला नित्य ठेवले आहे. तो माझ्या उजवीकडे आहे,
म्हणून मी ढळणार नाही.

३. माझे हृदय आनंदित होते, माझा आत्मा उल्हासतो, माझा देहही सुरक्षित राहतो.
कारण तू माझा आत्मा अधोलोकात राहू देणार नाहीस. तू आपल्या भक्तास नाशाचा अनुभव येऊ देणार नाहीस.

४. जीवनाचा मार्ग तू मला दाखव.
तुझ्या सान्निध्यत पूर्णानंद आहे,
तुझ्या उजव्या हातात सर्व सुखाचा खजिना आहे.

### दुसरे वाचन

**पेत्राचे पहिले पत्र यातून घेतलेले वाचन १:१७-२१**

**''त्याने आपल्या अनंत दयेनुसार आम्हाला संजीवित येशूख्रिस्ताद्वारे पुन: जन्म दिला.''**

''बंधूनो, जो ज्याच्या त्याच्या कृत्यांप्रमाणे न्याय करतो आणि जो तोंडदेखला न्याय करीत नाही त्याला जर तुम्ही पिता म्हणून हाक मारता, तर आपल्या प्रवासाच्या काळात भिऊनच वागा, कारण वाडवडलांच्या परंपरेने चालत आलेल्या तुमच्या निरर्थक वागणुकीपासून सोने, रुपे अशा नाशवंत वस्तूंनी नव्हे, तर निष्कलंक आणि निर्दोष कोकरु असा जो ख्रिस्त, त्याच्या मूल्यवान रक्ताने तुम्ही मुक्त झाला आहा. ज्याचे पूर्वज्ञान जगाच्या स्थापनेच्या आधी झाले होते तोच काळाच्या शेवटी तुम्हांसाठी प्रगट झाला. तुम्ही त्यांच्याद्वारे देवावर श्रध्दा ठेवणारे झाला आहा, त्या देवानेच त्याला मेलेल्यातून उठवून, त्याचा गौरव केल्यामुळे तुमचा विश्वास आणि तुमची आशा देवावर आहे.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**मत्तय ४:१३**

**आलेलुया, आलेलुया!**

हे प्रभू येशू ख्रिस्ता, आम्हाला शास्त्रवचने शिकव. आम्हाशी बोलून आमच्या हृदयात चेतना निर्माण कर.

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**लूकलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन**

**२४:१३-३५**

**''त्याने भाकर मोडली तेव्हा त्यांनी त्याला ओळखले.''**

आठवड्याच्या पहिल्या दिवशी त्यांच्यातील दोघेजण यरुशलेमापासून सुमारे चार कोसांवरील अम्माऊस नावाच्या गावाला चालले होते. ते त्या घडलेल्या सर्व गोष्टींविषयी एकमेकांशी संभाषण करीत होते. ते संभाषण आणि चर्चा करीत असताना येशू स्वत: जवळ येऊन त्यांच्याबरोबर चालू लागला. परंतु त्यांनी त्याला ओळखू नये म्हणून त्यांचे डोळे जणू काय बंद करण्यात आले होते. त्याने त्यांस म्हटले, ''तुम्ही चालताना ज्या गोष्टी एकमेकांबरोबर बोलत आहा त्या कसल्या?'' तेव्हा ते ग्लानमुख होऊन उभे राहिले. मग त्यांच्यातील क्लयपा नावाच्या इसमाने त्याला उत्तर दिले,

‘‘अलीकडे यरुशलेमात घडलेल्या गोष्टी ठाऊक नसलेले तुम्ही एकटेच प्रवासी आहात काय?’’ तो त्यांस म्हणाला, ‘‘कसल्या गोष्टी?’’ त्यांनी त्याला म्हटले, ‘‘नाझरेथकर येशूविषयीच्या. तो देवाच्या आणि सर्व लोकांच्या दृष्टीत कृतीने आणि उक्तीने पराक्रमी संदेष्टा होता, त्याला मुख्य याजकांनी आणि आमच्या अधिकाऱ्यांनी देहान्तशिक्षेविषयी पकडून क्रूसावर खिळले. परंतु इस्राएलची मुक्ती करणारा तो हाच अशी आमची आशा होती. शिवाय ह्या सर्व गोष्टी झाल्याला आज तिसरा दिवस आहे. आणखी आमच्यातील ज्या कित्येक स्त्रिया कबरेकडे मोठ्या पहाटेस गेल्या होत्या त्यांनी तर आम्हांस थक्कच केले. त्यांना त्याचे शरीर सापडले नाही, तेव्हा त्यांनी येऊन म्हटले की, आम्हांस देवदूतांचे दर्शन झाले आणि देवदूतांनी सांगितले की, तो जिवंत आहे. मग आमच्याबरोबर जे होते त्यापैकी कित्येक कबरेकडे गेले आणि त्या स्त्रियांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना आढळले, पण तो त्यांना दिसला नाही.’’ मग तो त्यांस म्हणाला, अहो निर्बुध्द आणि संदेष्ट्यांनी सांगितलेल्या सर्व गोष्टींविषयी विश्वास धरण्यास मतिमंद अशा माणसांनो! ख्रिस्ताने ही दु:खे सोसावी आणि गौरवात जावे ह्याचे अगत्य नव्हते काय? मग त्याने मोशे आणि सर्व संदेष्टे ह्यांच्यापासून आरंभ करून संपूर्ण शास्त्रातील आपणाविषयीच्या गोष्टींचा अर्थ त्यांस सांगितला.

मग ज्या गावाला ते जात होते त्याच्याजवळ ते आले तेव्हा त्याने पुढे जाण्याचा रोख दाखवला. परंतु ते त्याला आग्रह करून म्हणाले, ‘‘आमच्याबरोबर राहा, कारण संध्याकाळ होत चालली असून दिवस उतरला आहे.’’ तेव्हा तो त्यांच्याबरोबर राहावयास आत गेला. मग असे झाले की, ‘‘तो त्यांच्याबरोबर जेवावयास बसला असता त्याने भाकर घेऊन आशीर्वाद दिला आणि ती मोडून त्यांस दिली. तेव्हा त्यांचे डोळे उघडले आणि त्यांनी त्याला ओळखले. तोच तो त्यांच्यापासून अंतर्धान पावला. तेव्हा ते एकमेकांस म्हणाले, तो वाटेने आपल्याबरोबर बोलत होता आणि शास्त्राचा उलगडा करीत होता. तेव्हा आपल्या अंत:करणाला आतल्या आत उकळी येत नव्हती काय?’’ मग त्याच घटकेस ते उठून यरूशलेमास माघारे गेले. तेव्हा अकरा प्रेषित आणि त्याच्याबरोबरचे लोक एकत्र जमलेले त्यांना आढळले. ते म्हणत होते की, ‘‘प्रभू खरोखर उठला आहे आणि शिमोनच्या दृष्टीस पडला आहे!’’ मग त्यांनी वाटेतल्या घटना आणि त्याने भाकर मोडली तेव्हा आपण त्याला कसे ओळखले हे निवेदन केले.

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्या आनंदासह आपण आपल्या परमेश्वरपित्याकडे प्रार्थना करू या. त्याच्या अतिप्रिय पुत्राच्या प्रार्थना त्याने ऐकल्या आणि स्वीकारल्या: तो आपल्या मागण्या पूर्ण करील असा आपण विश्वास बाळगू या.

आपला प्रतिसाद असेल – **प्रार्थना करते है, वंदना करते है. (गायनात)**

१. ख्रिस्तसभेची समर्थपणे धुरा सांभाळणाऱ्या धर्मगुरू, धर्मभगिनी व धर्मबंधूंना परमेश्वराच्या दयेचा, प्रेमाचा व कृपेचा स्पर्श व्हावा, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करूया.

२. आपल्या कुटुंबांत, गावामध्ये, समाजामध्ये शांती, प्रेम व ऐक्य सतत नांदत राहावे म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करूया.

३. आपल्या पॅरिशमध्ये जे आजारी, वृद्ध व दु:खीकष्टी आहेत त्यांना परमेश्वराच्या प्रेमाचा व कृपेचा स्पर्श व्हावा म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करूया.

४. आपल्या देशातील व साऱ्या जगातील आतंकवाद व दहशतवाद नाहीसा व्हावा व शांतीचे राज्य पसरावे म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करूया.

५. आता आपण थोडा वेळ शांत राहून वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करूया.

## समारोप

हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांच्या या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, तुझ्या ख्रिस्तसभेकडून या भेटींचा स्वीकार कर, जो आनंद तू आम्हाला येथे देत आहेस तो आनंद परिपूर्ण स्वरूपात आम्हाला स्वर्गराज्यात अनुभवायला मिळो, ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, तुझ्या प्रजाजनांवर दयादृष्टीने पहा. पुनरुत्थानाच्या दिव्य रहस्यांमुळे आम्हाला पुनरुत्थानाच्या वैभवाचे वरदान दे. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## चिंतन

आजच्या पहिल्या आणि दुसऱ्या वाचनात (प्रे.कृ.२:१४, २२–२३; १ पेत्र.१:१७–२१) संत पीटर येशूच्या पुनरुत्थानाचे सत्य अगदी ठासून सांगतो. शुभवर्तमानातदेखील (लूक २४:१३–३५) हे सत्य एकूण चार प्रकारे सादर करण्यात आलेले आहे.

**अ) येशूचे पेत्राला दर्शन :** अम्माऊसच्या वाटेवरील शिष्य माघारी जेरूसलेमला पोहोचले तेव्हा इतर शिष्य म्हणत होते : ‘प्रभू उठला आहे आणि शिमोनच्या दृष्टीस पडला आहे.’ खरे पाहता, येशूने पेत्राला दर्शन दिल्याचा उल्लेख कोणत्याच शुभवर्तमानात करण्यात आलेला नाही. मात्र येशू ‘केफाला दिसला’ असे संत पौल नमूद करतो. (१ करिंथ. १५:५–७) त्याद्वारे पेत्राचे शिष्यगणातील अग्रस्थान सूचित करण्यात आलेले आहे.

**२) येशूच्या कार्याचा सारांश :** अम्माऊसच्या वाटेवरील शिष्य सोबतीच्या वाटसरूला येशूच्या कार्याची माहिती सारांशरूपाने देतात. त्यांना भूतकाळातील येशूविषयी माहिती असली तरी वर्तमानकाळातील ख्रिस्ताचा खरा अनुभव अजून यावयाचा होता. कारण तोपर्यंत त्यांचे डोळे बंद होते. त्यांच्या आशा मावळतील झुकलेल्या होत्या. त्यांची नजर खाली जमिनीकडे वळलेली होती.

**क) येशूने केलेले शास्त्रनिरूपण :** येशू ‘निर्बुध्द आणि मतिमंद’ अशा शब्दांत त्यांना खडसावतो. त्यानंतर तो त्यांना आपल्याविषयीच्या शास्त्रांचा उलगडा करून दाखवतो. इथे ‘अगत्य’ ह्या शब्दाचा अर्थ ‘देवाच्या योजनेशी सुसंगत असलेल्या आवश्यक बाबी’ (ग्रीक : देई) असा होतो.

**ड) भाकर मोडण्यावर भर :** वाटसरूच्या शास्त्रनरूपणाने समाधानी झालेले शिष्य त्याला आपल्या येथे उतरावयाची विनंती करतात. भोजनसमयी त्याने आशीर्वाद देऊन भाकर मोडली तेव्हा त्यांनी त्याला ओळखले. ही कृती इतकी महत्त्वाची होती की जेरूसलेमला परतल्यावर आपण त्याला ‘भाकर मोडताना’ कसे ओळखले त्याचा वृत्तान्त ते दोन शिष्य सादर करतात. शास्त्रनिरुपणामुळे (प्रभूशब्द विधीने) मात्र त्यांचे डोळे उघडले.

**आत्मपरीक्षण :** माझ्या जीवनात ‘अम्माऊसची वाट’ आणि ‘जेरुसलेमचा प्रवास’ ह्या घटना कशाप्रकारे घडत असतात? प्रभूला मी कोणकोणत्या बाबतीत ओळखतो वा ओळखण्यात कमी पडतो? ●●●

| एप्रिल २०२३ | दैनंदिन बायबल वाचन | | तिसरा सप्ताह |
|---|---|---|---|
| सोम २४ | सिग्मारिन्जनचा सं फिदेलिस (पां) | :प्रे.कृ.६:८–१५/योहान ६:२२–२९ | |
| मंगळ २५ | सं मार्क सुवार्तिक (पां) | :१ पेत्र. ५:५–१४/मार्क १६: १५–२० | |
| बुध २६ | सं पेड्रो डी सॅन जोस (पां) | : प्रे. कृ. ८:१–८/योहान ६:३५–४० | |
| गुरु २७ | लुई मेरी ग्रिग्निओन डी मॉन्टफोर्ट (पां) | : प्रे. कृ. ८:२६–४०/योहान ६:४४–५१ | |
| शुक्र २८ | सं पीटर चानेल (पां) | : प्रे. कृ. ९:१–२०/योहान ६:५२–५९ | |
| शनि २९ | सं कॅथरीन (पां) | : प्रे. कृ. ९:३१–४२/योहान ६: ६०–६९ | |